नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १५३ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. ०६ मे २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### बस स्कॉर्पिओचा भीषण अपघात

बदलापूर (स. गांवकरी) : कल्याण-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून मंगळवार, ५ मे रोजी सकाळी साडे दहाच्या सुमारास मुरबाड तालुक्यातील टोकावडे पोलीस ठाण्याच्या हद्दीत वैशाखरे फाट्याजवळ राज्य परिवहन मंडळाची बस आणि खासगी स्कॉर्पिओ गाडीचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील चौघांचा जागीच मृत्यू झाला असून अन्य चार जण गंभीर जखमी झाले आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा येथील एक कुटुंब स्कॉर्पिओने वाहनाने मुंबईच्या दिशेने जात होते. वैशाखरे फाट्याच्या पुढे समोरून येणाऱ्या राज्य परिवहन मंडळाच्या बसशी या वाहनाची जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की स्कॉर्पिओच्या समोरच्या भागाचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. या अपघातात अविनाश रामचंद्र काकडे, अभिषेक भाऊसाहेब मोटे (दोघे रा. वडाळा, ता. नेवासा), निता अशोक धुरे आणि मीना कल्याण मडके (दोघी रा. भेंडा, ता. नेवासा) यांचा जागीच मृत्यू झाला, अशी माहिती तहसिलदार अभिजित देशमुख यांनी दिली आहे. तर या अपघातात मोनिका अभिषेक मोटे, आराध्या अभिषेक मोटे, वेदांश अभिषेक मोटे आणि मनीषा रामदास बहक हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने उपचारासाठी कल्याण येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# खरातला शिर्डीच्या गुन्ह्यात अटक



राहाता : (स. गांवकरी)

शिर्डीतील जमीन खरेदी प्रकरण व समता पतसंस्थेत बोगस खाते उघडणे या दोन गुन्ह्यात मुख्य आरोपी असलेल्या भोंदू अशोक खरात याला सोमवारी रात्री शिर्डी पोलिसांनी नाशिक येथून तपासासाठी ताब्यात घेतले. त्याला आज, मंगळवारी राहाता न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला ९ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. मोठ्या पोलीस बंदोबस्तात खरातला येथील न्यायालयात हजर करण्यात आले होते.

पोलिसांनी खरातला सात दिवसांची पोलीस कोठडी न्यायालयाकडे मागितली. तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक निवांत जाधव यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, फिर्यादी गोंदकर यांची कोट्यवधी रुपयांची जमीन कमी किमतीत खरेदीखत लिहून घेऊन, त्यासाठी फिर्यादीस २ टक्के प्रति महिना दराने व्याजाने पैसे देऊन गुन्हा केला आहे.

व्याजाने देण्यासाठी तसेच जमीन खरेदी करण्यासाठी ५ कोटी ५२ लाख रुपये कोठून आले? खरात व त्याची पत्नी कल्पना खरात हिच्या बँक खात्यावरून झालेले व्यवहार हे प्राप्तिकर विभागाला दाखविले आहेत किंवा कसे? त्यासाठी पैसे कुठून मिळवले, व्याजाचे पैसे कोणी कोणी वाटून घेतले, खरातची पत्नी कल्पना फरार आहे. तिच्याकडून देखील आणखी माहिती घ्यायची आहे. एकूण १४ व्यवहार करण्यात आले. त्यात ५ कोटी ५२ लाखांचे व्यवहार होऊन फसवणूक केल्याचा उद्देश स्पष्ट होतो. कल्पना खरात हिचा शोध घेण्यासाठीही खरातकडे चौकशी करायची असून यासाठी कोठडीची मागणी या वेळी करण्यात आली.

शिर्डीतील रावसाहेब गोंदकर यांची खरातने ५० कोटी रुपयांची साडेचार एकर जमीन अवघ्या साडेपाच कोटींमध्ये खरेदी केली होती. गोंदकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिर्डी पोलिसांनी फसवणूक व सावकारी कायद्यानुसार, अशोक खरातसह त्याची पत्नी कल्पना खरातसह पाच जणांवर गुन्हा दाखल केला. यातील कल्पना खरातचा अटकपूर्व जामीन अर्ज राहाता न्यायालयाने फेटाळल्याने तिच्या अटकेचा मार्ग मोकळा झाला असला तरी ती अद्यापही पोलिसांच्या हाती लागलेली नाही. न्यायालयासमोर खरात खाली मान घालून स्तब्ध उभा होता. न्यायाधीशांनी भोंदू खरातला विचारले तुला काही सांगायचे आहे का? खरात मान हलवत म्हणाला नाही. न्यायालयाने खरातला ९ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

खरात यास काल, सोमवारी नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयात हजर करण्यात आले असता, ९ व्या गुन्ह्यात त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यानंतर काही वेळातच शिर्डी पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. शिर्डीचे पोलीस निरीक्षक निवांत जाधव यांच्यासह पथक सकाळपासूनच नाशिक येथील न्यायालयात हजर होते. त्यांनी खरातला ताब्यात घेऊन सोमवारी रात्री शिर्डीला आणले. त्याची रात्रीच येथील सरकारी ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

### समता पतसंस्थेतील व्यवहारांवर लक्ष

शिर्डीच्या जमीन खरेदीसाठी पैसे कोणी दिले, या व्यवहारात कोणकोण सहभागी होते, तसेच राहाता शहरातील समता पतसंस्थेत खरात याने ५७ लोकांच्या नावे १०० बनावट खाती उघडली असून या सर्व खात्यांचा वारसदार तोच आहे. त्यांनी या खात्यात आर्थिक व्यवहार कसे व कोणा मार्फत केले. समता पतसंस्थेत बोगस खाते उघडताना संस्थेचे अध्यक्ष व संचालकांचा काही सहभाग आहे का? याची माहिती तपासात उघड होण्याची शक्यता आहे.

### आरोपी खरातच्या वकिलांचा युक्तिवाद

जमीन मालकाने गुन्हा दाखल करायला एवढा उशीर का केला. फिर्यादीने अनेक पतसंस्था आणि बँकांकडून कर्ज घेतलं आहे आणि एकही कर्ज त्यांनी फेडलेले नाही. ५ कोटी ५२ लाखाला व्यवहार ठरला होता आणि ही रक्कम फिर्यादीच्या खात्यात अशोक खरात याने वर्ग केल्याचे आरोपीचे वकीलांनी युक्तीवाद करताना सांगितले. फिर्यादीतील सर्व मजकूर हा बनवले वाटतो आहे. खरात यांच्यावर नाशिक येथे गुन्हा दाखल झाल्यानंतर ही संपूर्ण प्रक्रिया फिर्यादी याला विश्वासात घेऊन शिर्डी पोलिसांत करण्यात आली आहे. फिर्यादी याच्या जमीन व्यवहारामध्ये बळजबरी करीत कोणत्याही सह्या आरोपीने घेतल्या नाहीत असा युक्तीवाद बचाव पक्षाने केला आहे.




# सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढवण्यास मंजुरी

मुंबई : (स. गांवकरी)

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. यात दरवर्षी दाखल होणाऱ्या प्रकरणांमुळे अधिक भर पडते. एकदा एखादं प्रकरण न्यायालयात गेलं की त्याच्या निकालांपर्यंत अनेक वर्षांचा काळ जातो. त्यामुळे न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढते. या पार्श्वभूमीवरच आता केंद्र सरकारने एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. आज पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली आहे. या बैठकीत अनेक मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. या निर्णयामध्येच सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या संख्येत वाढ करण्याबाबत एका निर्णयाचा समावेश आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने आता सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढवण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची एकूण संख्या ३३ वरून ३८ होणार आहे. दरम्यान, केंद्रीय मंत्रिमंडळाने सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढवण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली असली तरी या संख्येत भारताच्या सरन्यायाधीशांचा (CJI) समावेश नाही. या बरोबरच हा महत्त्वपूर्ण बदल लागू करण्यासाठी आता केंद्र सरकार आगामी अधिवेशनात सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) सुधारणा विधेयक २०२६ सादर करण्याची शक्यता आहे.

**केंद्र सरकारचा मोठा निर्णय**

दरम्यान, न्यायाधीशांची संख्या वाढवण्यासाठी ‘सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) कायदा १९५६’ मध्ये सुधारणा करण्याकरिता ‘सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) सुधारणा विधेयक २०२६’ संसदेत सादर करण्याच्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यांनुसार सर्वोच्च न्यायालयाला अधिक मजबूत करण्याच्या अनुषंगाने हे पाऊल उचलण्यात येत आहे. कारण सर्वोच्च न्यायालयात ९२ हजारांहून अधिक खटले प्रलंबित आहेत. त्यामुळे लवकरात लवकर हे प्रलंबित खटले निकाली निघाले पाहिजेत हा यामागील हेतू असल्याचं सांगितलं जात आहे.






# थोडक्यात पण महत्वाचे



## अनधिकृत फ्लेक्सला अखेर आळा; आश्वासनानंतर आंदोलन स्थगित!

कोपरगाव (स. गांवकरी) : शहरातील वाढत्या अनधिकृत फ्लेक्सबाजी विरोधात सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी सुरू केलेले धरणे आंदोलन नगरपरिषदेच्या ठोस आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले. नगराध्यक्ष पराग संधान यांनी आंदोलनस्थळी भेट देत शहरातील बेकायदा फ्लेक्स हटविण्यासाठी आगामी आठ दिवसांत धोरण निश्चित करून अंमलबजावणी सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले. कोपरगाव शहरात राजकीय नेते, वाढदिवस, नियुक्त्या व विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर विनापरवाना फ्लेक्स लावले जात असल्याने शहराचे विद्रुपीकरण होत असून वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत असल्याची तक्रार वारंवार होत होती. याबाबत उच्च न्यायालयाचे आदेश असूनही प्रशासन कारवाई करत नसल्याचा आरोप करत संजय काळे यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी दालनासमोर धरणे आंदोलन सुरू केले होते. दरम्यान, नगराध्यक्ष पराग संधान यांनी आंदोलनस्थळी धाव घेत नगरपरिषदेच्या २२ एप्रिलच्या सर्वसाधारण सभेत बेकायदा फ्लेक्स हटविण्याचा ठराव मंजूर झाल्याची माहिती दिली. तसेच शहरात फ्लेक्ससाठी निश्चित जागा, संख्या, परवाना प्रक्रिया व कालमर्यादा याबाबत स्वतंत्र धोरण जाहीर करण्यात येईल, असे स्पष्ट केले. यावेळी संजय काळे यांनी प्रशासन, पोलीस आणि नगरपरिषदेला यापूर्वी अनेकदा निवेदने देऊनही कारवाई न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त करत उच्च न्यायालयाच्या आदेशांचा अवमान होत असल्याचा आरोप केला. अखेर नगरपरिषदेच्या आश्वासनानंतर त्यांनी आंदोलन मागे घेतले असून, आठ दिवसांत कारवाई न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## तळेरान येथे तळ्यात बुडून जुळ्या भावंडांचा दुर्दैवी मृत्यू; परिसर शोकमग्न!



ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील तळेरान येथील वसईवाडी परिसरात मंगळवारी हृदयद्रावक घटना घडली असून, तळ्यात बुडाल्याने जुळ्या भावंडांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, श्रावणी रामदास साबळे व गणेश रामदास साबळे (वय ११) अशी मृत्यू झालेल्या जुळ्या भावंडांची नावे आहेत. उन्हाळी सुट्टीमुळे दोघेही घरी होते. मंगळवारी सकाळी सुमारे ११.१५ वाजता ते आपल्या मोठ्या बहिणीसोबत गावाजवळील तळ्यावर कपडे धुण्यासाठी गेले होते. बहिण कपडे धुत असताना श्रावणी आणि गणेश खेळता खेळता पाण्यात उतरले. पोहण्याचा प्रयत्न करत असताना दोघेही खोल पाण्यात गेल्याने बुडू लागले. ही बाब लक्षात येताच बहिणीने आरडाओरडा करून मदतीसाठी हाक मारली. मात्र तिला पोहता येत नसल्याने ती दोघांना वाचवू शकली नाही. त्या वेळी परिसरात कोणीही मोठी व्यक्ती नसल्याने तातडीची मदत मिळू शकली नाही. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तळ्याकडे धाव घेत शोधमोहीम सुरू केली. सुमारे अर्ध्या तासाच्या प्रयत्नानंतर प्रथम श्रावणीला पाण्याबाहेर काढण्यात आले, तर काही वेळाने गणेशलाही बाहेर आणण्यात आले. दोघांनाही तातडीने ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. या दुर्दैवी घटनेमुळे साबळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून, कुटुंबात चार मुली आणि एक मुलगा होता. या अपघातामुळे संपूर्ण गाव शोकमग्न झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली ओतूर पोलीस करत आहेत.

## विकास कामांची शासकीय कमिटी कडून पाहणी, कामाचे कौतुक



पाथर्डी (स. गांवकरी) : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत पाच सदस्यीय शासकीय कमिटीने तालुक्यातील शिरसाटवाडी येथे भेट देऊन गावात झालेल्या विविध विकास कामांची पाहणी केली. यावेळी कमिटीचे प्रमुख गटविकास अधिकारी कैलास बळवंत यांनी गावातील झालेली विकास कामे व सरपंच सौ. भावना पालवे यांचे कौतुक केले. यावेळी कमिटीने गावातील सिमेंट काँक्रीट रस्ते, देवस्थान सभामंडप, भूमिगत गटारे, स्ट्रीट लाईट, सिंगल फेज वीज व्यवस्था, सुसज्य ग्रामपंचायत कार्यालय, अद्ययावत व्यायामशाळा, रेन वॉटर हार्वेस्टिंग यांसह विविध कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. शासन दरबारी पाठपुरावा करून गावात पायाभूत सुविधा निर्माण करणे व त्या माध्यमातून गावाचा विकास साधणे हेच सरपंचाचे प्रमुख काम असते. शिरसाटवाडी गावामध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या विकास कामांवर आपण समाधानी असल्याचे मत व्यक्त करत सरपंच सौ. भावना पालवे यांचे कौतुक कमिटीने केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य तथा मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे, ग्रामसेवक अशोक साळुंखे, ग्रामपंचायत सदस्य जनाबाई शिरसाट, कर्मचारी अंकुश शिरसाट, अशोक फुंदे, बाबुराव शिरसाट उपस्थित होते. जिल्ह्यात मनसेची सत्ता असलेली शिरसाटवाडी ही एकमेव ग्रामपंचायत असून जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांच्या पत्नी सौ. भावना पालवे या सरपंच आहेत.

## बाबूजी आव्हाड महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत यश

पाथर्डी (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे बोर्ड कडून बारावीचा निकाल ऑनलाईन नुकताच जाहीर करण्यात आला. या परीक्षेमध्ये बाबूजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयात कला शाखेत प्रथम क्रमांक शिरसे मारिया भीमराव (75.50%), द्वितीय डीसले गणेश नवनाथ (73.67%), तृतीय क्रमांक पवार महेश अण्णासाहेब ( 70.17%) वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक इंगळे वेदांत महेश ( 67.83%) द्वितीय चव्हाण गणेश विष्णू (61.00% ) आणि तृतीय काळोखे कृष्णा अण्णासाहेब (60.17%) तसेच विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक तुवर आरुष राजेंद्र (85.17%) द्वितीय लांडे आयुष भाऊसाहेब (84.67%) तर तृतीय हिरवे क्षितिज सुधीर (80.17%) तर एच एस सी होकेशनल शाखेत प्रथम क्रमांक चव्हाण ज्योती नवनाथ (60.67%), द्वितीय गायके मीरा हरिश्चंद्र (57.00%) तृतीय अंबाडे आप्पासाहेब बाबा (52.17%) यांनी मिळविला. या सर्व विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात गुणगौरव करण्यात आला.







# नारायण आरोटे यांचा प्रगतशील शेतकरी पुरस्काराने सन्मान

**रणरागिनी शौर्य पुरस्कार सोहळ्यात डॉ. विश्वासराव आरोटे यांचे मार्गदर्शन!**

नाशिक : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील चितळवडे येथील प्रगतशील व उत्कृष्ट शेतकरी नारायण देवराम आरोटे यांना त्यांच्या कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत यावर्षीचा प्रगतशील शेतकरी पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. नाशिक येथे पार पडलेल्या भव्य समारंभात त्यांना सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

नारायण आरोटे यांनी आधुनिक शेती पद्धती, पीक व्यवस्थापन, शेतीतील नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि उत्पादनवाढीसाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे परिसरात आदर्श शेतकरी म्हणून ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या यशामुळे चितळवडे व प्रवरा परिसरातील शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सन्मान सोहळ्यास थोर उद्योजक व दानशूर व्यक्तिमत्त्व नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, आमदार सीमा हिरे, नगरसेविका मयुरी पवार, संगीत विशारद गायिका मयुरी, मिसेस इंडिया 2024 पुरस्कार विजेत्या स्मिता अहिरे, संपादिका गायत्री लचके यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, नाशिक जिल्ह्यातील गंगापूर येथे आयोजित रणरागिनी शौर्य पुरस्कार कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी पत्रकारांना मार्गदर्शन केले. पत्रकारितेतील नीतिमत्ता, सामाजिक जबाबदारी, निष्पक्ष वृत्तांकन आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याची भूमिका याबाबत त्यांनी उपस्थित पत्रकारांना मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. आरोटे यांनी पत्रकारितेचा समाज परिवर्तनात असलेला महत्त्वपूर्ण वाटा अधोरेखित करत पत्रकारांनी सत्य, निर्भीड आणि जनहिताची पत्रकारिता करण्याचे आवाहन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित पत्रकारांना नवी दिशा व प्रेरणा मिळाली. या दोन्ही कार्यक्रमांमुळे कृषी, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा गौरव होत असून उपस्थितांनी कार्यक्रमांचे कौतुक केले.

## मुरबाड-माळशेजघाट महामार्गावर भीषण अपघात

वैशाखरे, मुरबाड : (स. गांवकरी)

मुरबाड-माळशेजघाट महामार्गावर वैशाखरे गावाजवळ आज दुपारी एसटी बस आणि स्कॉर्पिओ यांच्यात भीषण समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात ४ जणांचा जागीच मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. प्राथमिक माहितीनुसार, मुरबाडहून माळशेजच्या दिशेने जाणारी एसटी बस आणि समोरून येणारी स्कॉर्पिओ यांच्यात घाट परिसरात जोरदार धडक झाली. अपघाताची तीव्रता इतकी होती की स्कॉर्पिओ वाहनाचा अक्षरशः चक्काचूर झाला. धडकेचा आवाज दूरवर ऐकू गेल्याने स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. अपघाताची माहिती मिळताच पोलीस, आपत्कालीन यंत्रणा आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. पोलिसांकडून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू असून मृतांची ओळख पटविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या भीषण अपघातामुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.



एसटी-स्कॉर्पिओ धडकेत ४ ठार, अनेक जखमी!

## बस आगारातील गाळे विस्थापितांना देण्याबाबत सुनावणी

कोपरगाव : (स. गांवकरी)



कोपरगाव शहरातील बस स्थानक परिसरातील सि.टी.एस. क्र. १८०९ या जागेवरून विस्थापित झालेल्या दलित समाजातील कुटुंबांना बस आगारातील नियोजित व्यापारी गाळे देण्याबाबत सुनावणी करून निर्णय घ्यावा, असे आदेश उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य परिवहन विभागाला दिले आहेत. या प्रकरणी आठ आठवड्यांच्या आत निवाडा करण्याचे निर्देश न्यायालयाने दिल्याने विस्थापित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, कोपरगाव शहरातील सि.टी. एस. क्र. १८०९ या जागेवर दलित समाजातील ४८ कुटुंबांची घरे होती. सन १९५८ नंतर या जागेवर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे बस स्थानक, कार्यशाळा व पेट्रोल पंप उभारण्यात आले. त्यावेळी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी विस्थापित कुटुंबांना बस स्थानकाजवळ ३५ बाय २५ आकाराचे ४८ भूखंड देण्याचे आदेश २७ मे १९५९ रोजी पारित केले होते. मात्र, अनेक दशकांनंतरही या कुटुंबांना भूखंडांचे वाटप करण्यात आले नाही. यामुळे विस्थापितांनी २३ फेब्रुवारी २०२४ रोजी कोपरगाव बस स्थानकाच्या आगारप्रमुखांकडे लेखी अर्ज करून बस स्थानक परिसरातील नियोजित व्यापारी संकुलातील गाळे विस्थापितांना वितरित करण्याची मागणी केली होती. त्यानंतर वारंवार पाठपुरावा करूनही परिवहन विभागाकडून कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. परिणामी न्यायासाठी कोपरगाव येथील रहिवासी प्रकाश सुखदेव दुशिंग, बाबासाहेब भास्कर कोपरे व अन्य नागरिकांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात ॲड. शिवराज कडू यांच्या मार्फत रिट याचिका क्र. ६७२४/२०२५ दाखल केली होती. या याचिकेची नुकतीच सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. शिवराज कडू यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, विस्थापितांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देऊन २३ फेब्रुवारी २०२४ च्या निवेदनावर निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यानुसार न्यायालयाने राज्य परिवहन मंडळाच्या अहिल्यानगर येथील विभागीय अधिकाऱ्यांना संबंधित प्रकरणाचा आठ आठवड्यांच्या आत निवाडा करून निर्णय घेण्याचे आदेश दिले. या प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने ॲड. एम. ए. आहेर तर परिवहन विभागाच्या वतीने ॲड. ओ. डी. वांगे यांनी बाजू मांडली. न्यायालयाच्या या आदेशामुळे तब्बल अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या विस्थापित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला असून, आता बस आगारातील व्यापारी गाळ्यांचे वाटप होण्याची आशा निर्माण झाली आहे.

## मयत कर्जदार सभासदाचे वारसास धनादेश वितरण

(स. गांवकरी)



बुलडाणा अर्बन विभाग छत्रपती संभाजीनगर अंतर्गत नेवासा शाखेच्या वतीने मयत कर्जदार सभासदाचे वारसास विमा धनादेश वितरण करण्यात आला. सहकाराची समृद्ध परंपरा जतन करण्याबरोबरच सहकाराला सामाजिक कार्याची जोड देऊन ग्राहक लघु उद्योजक व शेतकरी सभासदांच्या हितासाठी आर्थिक व सोशल बँकिंग राबविणारी व आशिया खंडातील प्रथम क्रमांकाची संस्था म्हणून नावलौकिक मिळवणाऱ्या बुलढाणा अर्बन संस्थेच्या छत्रपती संभाजीनगर विभागातील शाखा नेवासा च्या वतीने मयत कर्जदाराच्या वारसास विमा धनादेशाचे वितरण करण्यात आले. शाखा नेवासा कार्यक्षेत्रातील मौजे भानस हिवरा येथील रहिवासी व संस्थेचे सभासद श्री राजेंद्र गंगाधर भोईटे यांनी दिनांक 15/04/2025, रोजी शाखा नेवासा येथून सोनेतारण कर्ज रक्कम रुपये 145000/- घेतले होते दरम्यान त्यांचा दिनांक 10/01/26 रोजी अपघाती दुर्दैवी मृत्यू झाला. संस्थेच्या वतीने ठेवीदाराला ठेवी रक्कमे एवढे व कर्जदारास कर्ज रक्कम एवढे अपघाती विमा संरक्षण देण्यात येते सदर घटनेची माहिती मिळताच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री राधेश्यामजी चांडक (भाईजी) संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ. सुकेशजी झंवर सर व संस्थेचे सर व्यवस्थापक कैलासजी कासट सर यांच्या आदेशानुसार तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय व्यवस्थापक श्री. रमेश मुळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा व्यवस्थापक श्री ईश्वर मुरलीधर काकडे यांनी भोईटे यांच्या घरी भेट देऊन परिवाराचे सांत्वन करून मयत सभासदाच्या वारसास लागू असलेल्या अपघाती विमा संबंधी सर्व माहिती दिली. यावेळी भोईटे कुटुंबाकडून आवश्यक ती सर्व कागदपत्राची पूर्तता करून विमा प्रस्ताव मुख्यालयाकडे सादर करण्यात आला. या योजनेअंतर्गत ICICI Lombard कंपनीने मयत कर्जदार स्व.श्री राजेंद्र गंगाधर भोईटे यांच्या कर्जाच्या व्याजासह पूर्ण रक्कमेचा 161720/- चा क्लेम मंजूर करून आज दिनांक 05/05/2026 रोजी मयत खातेदार सभासद यांच्या वारसदार सौ. सविताबाई राजेंद्र भोईटे यांना सोनेतारण कर्ज खात्यातील सोने चिज वस्तू प्रतिष्ठित सभासद डॉक्टर श्री. रोहित पाटील साहेब, श्री राजेंद्र वाघमारे ,श्री सोपान गुंजाळ, श्री विजय धनाळे, श्री किरण गरड व श्री संतोष उंडे यांच्या हस्ते देण्यात आल्या. यावेळी शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री ईश्वर काकडे व शाखेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा रस्ता रोको आंदोलन




पारनेर : (स. गांवकरी)

१५ मे २०२६ रोजी कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते रवींद्र राजदेव तसेच गटाच्या नेत्या सोनिया ताई राजदेव यांच्या नेतृत्वाखाली नगर-कल्याण महामार्गावरील टाकळी ढोकेश्वर येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन अपर जिल्हा दंडाधिकारी श्री. दादासाहेब गीते यांना देण्यात आले. यावेळी राजदेव यांनी शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि आंदोलनाची रूपरेषा याबाबत अप्पर जिल्हा दंडाधिकारी श्री दादासाहेब गीते यांच्याशी सविस्तर चर्चा केली. निवेदन देताना रवींद्र राजदेव यांनी सांगितले की, गेल्या काही महिन्यांपासून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रचंड आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. बाजारात कांद्याचे भाव अतिशय घसरले असून, उत्पादन खर्चही वाढल्याने शेतकऱ्यांची दशा बिकट झाली आहे. “शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत (एमएसपी) देण्यात यावी, निर्यातीवर असलेली बंदी हटवावी, कोल्ड स्टोरेज सुविधा वाढवाव्यात आणि कांदा निर्यातीसाठी सरकारी पातळीवर प्रयत्न करावेत,” अशा प्रमुख मागण्यांचा समावेश निवेदनात करण्यात आला.

# ५०+ यशस्वी मिनिमली इन्वेसिव्ह हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रियांचा टप्पा

नाशिक : (स. गांवकरी)



अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे ऑर्थोपेडिक विभागाच्या वतीने डायरेक्ट अँटेरियर मिनिमली इन्वेसिव्ह हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रियांचे ५० हून अधिक यशस्वी टप्पे पूर्ण झाल्याबद्दल विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात आधुनिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रुग्णांना मिळणाऱ्या फायद्यांविषयी माहिती देण्यात आली. या उल्लेखनीय कामगिरीचे श्रेय ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. सागर काकतकर आणि त्यांच्या टीमला जाते. त्यांनी Direct Anterior Approach या अत्याधुनिक पद्धतीचा वापर करून हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. या पद्धतीबाबत माहिती देताना तज्ज्ञांनी सांगितले की, डायरेक्ट अँटेरियर ॲप्रोच ही एक मिनिमली इन्वेसिव्ह (कमी जखम करणारी) शस्त्रक्रिया पद्धत आहे. या तंत्रामध्ये स्नायू कापण्याऐवजी त्यांच्या मधील नैसर्गिक मार्गातून शस्त्रक्रिया केली जाते. त्यामुळे स्नायूंना कमीत कमी इजा होते, रक्तस्त्राव कमी होतो, वेदना कमी होतात आणि रुग्णांना जलद पुनर्वसन मिळते. रुग्ण शस्त्रक्रियेनंतर लवकर चालू शकतात आणि अल्पावधीतच त्यांच्या दैनंदिन जीवनात परत येऊ शकतात. विशेष म्हणजे, अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल हे नाशिकमधील MIS Direct Anterior Hip Replacement Surgery साठी एकमेव मान्यताप्राप्त प्रशिक्षण केंद्र आहे. या प्रगत तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षणासाठी देशभरातील अनेक ऑर्थोपेडिक सर्जन्स डॉ. सागर काकतकर यांच्याकडे प्रशिक्षणार्थी म्हणून येतात. यामुळे नाशिक शहराला या विशेष शस्त्रक्रिया तंत्रज्ञानाच्या शिक्षणाचेही एक महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळख मिळत आहे.

यावेळी बोलताना डॉ. सागर काकतकर म्हणाले, “हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया ही पूर्वी मोठी आणि गुंतागुंतीची प्रक्रिया मानली जायची. मात्र, डायरेक्ट अँटेरियर ॲप्रोचमुळे आज आपण रुग्णांसाठी ही शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित, अचूक आणि सुलभ बनवू शकलो आहोत. स्नायूंना कमीत कमी इजा होत असल्यामुळे रुग्णांना कमी वेदना होतात आणि ते लवकर उभे राहून चालण्यास सक्षम होतात. आमच्यासाठी ही केवळ शस्त्रक्रियांची संख्या नसून, प्रत्येक रुग्णाच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल आहे. तसेच, या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी देशभरातील डॉक्टर आमच्याकडे येतात, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. नाशिकमध्ये जागतिक दर्जाचे उपचार आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे.” या कार्यक्रमात ऑर्थोपेडिक विभागातील इतर तज्ज्ञ डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि हॉस्पिटलचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी डॉ. राहुल सुपे, डॉ. जयेश सोनजे आणि डॉ. श्रीकांत जाधव यांनी देखील उपस्थितांशी संवाद साधत या महत्त्वपूर्ण टप्प्याबद्दल टीमचे विशेष कौतुक केले. यावेळी बोलताना अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे केंद्र प्रमुख श्री. अनुप त्रिपाठी यांनी सांगितले की, “अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून रुग्णांना सर्वोत्तम आरोग्यसेवा देणे हा आमचा ध्यास आहे. डॉ. सागर काकतकर आणि त्यांच्या टीमने साध्य केलेला हा टप्पा अत्यंत अभिमानास्पद आहे. तसेच, आमचे हॉस्पिटल नाशिकमधील एकमेव मान्यताप्राप्त प्रशिक्षण केंद्र असल्यामुळे या क्षेत्रात आमची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. भविष्यातही आम्ही अशाच नाविन्यपूर्ण आणि रुग्ण-केंद्रित सेवा देण्यास कटिबद्ध आहोत.”

# थोडक्यात पण महत्वाचे

## मातोश्री. कै.सौ. हिराबाई अर्जुन उगले यांचे निधन



डोंगरगाव (स. गांवकरी) : डोंगरगाव येथील ज्येष्ठ व्यक्तिमत्व श्री. अर्जुन नारायण उगले यांच्या पत्नी व श्री. ज्ञानेश्वर अर्जुन उगले यांच्या मातोश्री कै. सौ. हिराबाई अर्जुन उगले (वय ६८ वर्षे) यांचे गुरुवार दि. ३० एप्रिल २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुपारी ०२:३० च्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. तसेच दुसऱ्या दिवशी शुक्रवारी सकाळी ८ वाजता रक्षाविसर्जन करण्यात आले. त्यावेळी डोंगरगाव आणि पंचक्रोशीतील अनेक ग्रामस्थ तसेच अनेक नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होते. मातोश्री हिराबाईंच्या पश्चात पती,मुलगा, सून, मुली, जावई, नातवंडे, पुतणे, पुतण्या, दीर, भाये, जावा, सासू, सासरे, इ असा मोठा परिवार आहे. शनिवार दिनांक ९ मे २०२६ रोजी मातोश्री हिराबाई उगले यांचा दशक्रिया विधी डोंगरगाव येथील आढळा नदीतीरावर शनैश्वर व भोलेश्वर विसावा आश्रम येथे होणार आहे. व त्यावेळी ह.भ. प. मयुरीताई शिंदे (शेटे) यांचे प्रवचन होणार आहे.

## शून्य चलन-विनिमय फरकासह निधी हस्तांतरण सेवा सुरू

मुंबई (स. गांवकरी) : AU Small Finance Bank (एयू) या बँकेने आंतरराष्ट्रीय निधी हस्तांतरण क्षेत्रात पारदर्शकता आणण्यासाठी शून्य चलन-विनिमय फरक आणि शून्य बँक शुल्क असलेली नवी सेवा सुरू केली आहे. या उपक्रमामुळे देशांतर्गत तसेच परदेशातील व्यवहार करताना लपलेले खर्च पूर्णपणे दूर होणार असून ग्राहकांना प्रत्यक्ष संदर्भ विनिमय दरावर व्यवहार करण्याची सुविधा मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्ये साधारणपणे दिसणाऱ्या शुल्कांव्यतिरिक्त विनिमय दरामध्ये लपलेला अतिरिक्त फरक आकारला जातो. हा 'अदृश्य खर्च' अनेक वर्षांपासून ग्राहकांवर पडत होता. एयू बँकेच्या नव्या सेवेमुळे हा लपलेला खर्च पूर्णतः काढून टाकण्यात आला असून व्यवहार करताना कोणताही अतिरिक्त दरफरक किंवा शुल्क आकारले जाणार नाही. यामुळे परदेशात शिक्षणासाठी निधी पाठवणारे पालक, कुटुंबीयांना आर्थिक मदत करणारे नागरिक तसेच गुंतवणुकीसाठी निधी पाठवणाऱ्या ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार आहे. ही सेवा Liberalised Remittance Scheme अंतर्गत परदेशात निधी पाठवणाऱ्या भारतीयांसाठी उपयुक्त ठरणार असून परदेशस्थ भारतीय नागरिकांनाही (एनआरआय) या योजनेचा लाभ मिळणार आहे. परदेशातून भारतात निधी पाठवताना कोणताही चलन-विनिमय फरक किंवा बँक शुल्क लागू न होणार असल्याने परदेशात कमावलेली रक्कम अधिक प्रमाणात कुटुंबीयांपर्यंत पोहोचेल. बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी उत्तम तिब्रेवाल यांनी सांगितले की, ग्राहकांना व्यवहाराच्या शेवटी किती रक्कम मिळेल याबाबत असलेली अस्पष्टता दूर करणे हेच या उपक्रमामागील मुख्य उद्दिष्ट आहे. बँकिंग सेवा सोपी, स्पष्ट आणि न्याय्य करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा असल्याचे त्यांनी नमूद केले.

## श्री क्षेत्र अंतापूरच्या विकासासाठी निधीची गरज; सुविधांची मागणी!



कोपरगाव (स. गांवकरी) : नाशिक जिल्ह्यातील अंतापूर येथील सर्वधर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या दावल मलिक बाबा देवस्थानाच्या विकासासाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी भाविकांकडून होत आहे. या संदर्भात श्री क्षेत्र पोहेगाव–श्री क्षेत्र अंतापूर पायी पालखी सोहळ्याचे अध्यक्ष रमेशबाबा औताडे यांनी बागलाणचे आमदार दिलीप बोरसे यांना निवेदन देऊन देवस्थान परिसरात आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची मागणी केली आहे. नाशिक, नगर, संभाजीनगर, धुळे, जळगाव आदी जिल्ह्यांतून वर्षभर मोठ्या संख्येने भाविक व पालख्या दर्शनासाठी येत असताना त्या ठिकाणी निवास, पिण्याचे पाणी, स्वयंपाकगृह, पालखी निवारा, पार्किंग यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने भाविकांची मोठी गैरसोय होत आहे. दावल मलिक बाबा दर्गा हे महाराष्ट्रातील सर्वधर्मीयांचे श्रद्धास्थान असून धार्मिक सलोख्याचे प्रतीक मानले जाते. येथे हिंदू-मुस्लिम समाजाकडून एकत्रितपणे यात्रोत्सव साजरा केला जातो. अनेक भाविक नवसपूर्तीसाठी येथे येतात आणि पिराची झोळी व फावडी सेवा ही परंपरा विशेष महत्त्वाची मानली जाते. दरवर्षी येथे यात्रोत्सव मोठ्या उत्साहात भरत असून छबिना मिरवणूक, तमाशा, निकाली कुस्त्या यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. श्री क्षेत्र अंतापूर हे सद्गुरू श्री शंकर महाराजांचे जन्मगाव म्हणूनही प्रसिद्ध असून येथे दर्गा आणि मंदिर अशी संमिश्र धार्मिक संस्कृती पाहायला मिळते. गुरुवार, दत्तजयंती, चैत्र पौर्णिमा, गुरुपौर्णिमा, श्रावण महिना, गुढीपाडवा, नवरात्रोत्सव, दसरा, दिवाळी, रामनवमी आदी सण-उत्सवांच्या काळात येथे लाखो भाविक उपस्थित राहतात; मात्र त्यानुसार सुविधा उपलब्ध नाहीत. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन, पार्किंग व्यवस्था, पायी दिंडीसाठी प्रशस्त रस्ता, गडावर चढण्यासाठी पायऱ्या, पथदिवे, पाण्याची टाकी, सभामंडप व इतर विकासकामे तातडीने होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वन विभागाची परवानगी घेऊन जिल्हा वार्षिक योजना तसेच प्रादेशिक पर्यटन व तीर्थक्षेत्र विकास निधीतून या कामांना मंजुरी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यापूर्वीही अनेक भक्तांनी पाठपुरावा करूनही उपयोग झालेला नसल्याने आमदार दिलीप बोरसे यांनी या कामात विशेष लक्ष घालून श्री क्षेत्र अंतापूर येथे आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करून भाविकांची गैरसोय दूर करावी, अशी अपेक्षा रमेशबाबा औताडे यांनी व्यक्त केली आहे.


### जाहीर नोटीस

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामिण यांचे कार्यालय**
५, बी. जे. रोड, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, पुणे ४११ ००१.
दुरध्वनी: ०२०–२६१२५७७९ email : ddrpunegramingmail.com
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये
जा.क्र. २३५/२०२५–२६ **जाहिर नोटीस** अर्ज क्रमांक ४६/२०२५–२६
दिनांक:– २७/०४/२०२६
(नियोजित) अभिषेक अपार्टमेंट को–ऑप हौसिंग सोसायटी ली.,
पत्ता– स.नं. २९८/६, खोडद रोड, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे– ४१०५०४
तर्फे मुख्य प्रवर्तक श्री. आशिष गजानन माळवदकर ..................... **अर्जदार**
**विरुद्ध**............१) श्री. गणेश रामदास मेहेत्रे (विकासक/जागा मालक)
२) श्री. अनिकेत रामदास मेहेत्रे (विकासक/जागा मालक)
३) वरील १ व २ रा. नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे– ४१०५०४ ......... **जाबदेणार**
वरील नमूद अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने वरील नमूद मुख्य प्रवर्तक यांनी संस्थेच्या नोंदणीबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर नियोजित संस्थेच्या नोंदणी प्रस्तावाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक ०८/०६/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे १ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहिल्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून पुढील निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
ठिकाण: पुणे. (प्रकाश ल. जगताप)
दिनांक: २७/०४/२०२६ सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पुणे.







# राज्यभरातील कर्तृत्ववान महिलांचा गौरव!

**'शौर्य रणरागिणी न्यूज'चा प्रथम वर्धापन दिन व 'शौर्य पद्मराज रत्न पुरस्कार' सोहळा नाशिकमध्ये दिमाखात संपन्न**



नाशिक : (स. गांवकरी)

सातपूर येथील मोतीवाला कॉलेजच्या भव्यदिव्य ऑडिटोरियम हॉलमध्ये 'शौर्य रणरागिणी न्यूज'चा प्रथम वर्धापन दिन, 'शौर्य पद्मराज रत्न पुरस्कार' तथा पत्रकार सन्मान सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, भव्य आणि दिमाखदार वातावरणात पार पडला. राज्यभरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना सन्मानित करत महिला सक्षमीकरणाचा प्रेरणादायी संदेश देणारा हा सोहळा सर्वांच्या स्मरणात राहणारा ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून समाजभूषण नानजीभाई खेमजीभाई ठक्कर (डायरेक्टर, NKT Group ठाणे), पश्चिम नाशिकच्या आमदार सीमाताई महेश हिरे, नगरसेविका तथा स्थायी समिती सदस्य मयुरीताई अंकुश पवार, मिसेस इंडिया २०२४ व मिसेस महाराष्ट्र २०२३ सौ. स्मिता अहिरे, सामाजिक कार्यकर्ते संदीप रमेश शर्मा, सुप्रसिद्ध कलाकार मयुरीजी सोनी तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांची विशेष उपस्थिती लाभली.

शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार भाऊसाहेब वाकचौरे हे काही अपरिहार्य कारणास्तव प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत; मात्र त्यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे कार्यक्रमास शुभेच्छा देत 'शौर्य रणरागिणी न्यूज'च्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या. या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे राज्यभरातून विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना प्रदान करण्यात आलेला 'शौर्य पद्मराज रत्न पुरस्कार'. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पत्रकारिता, आरोग्य, महिला सक्षमीकरण, कला आणि सेवाभावी कार्यात मोलाचे योगदान देणाऱ्या महिलांचा सन्मान होत असताना सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून 'शौर्य रणरागिणी न्यूज'च्या ध्येयवादी पत्रकारितेचे कौतुक करत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या माध्यम संस्थेचे अभिनंदन केले. महिला सक्षमीकरणासाठी उचललेले हे पाऊल समाजासाठी प्रेरणादायी असून अशा उपक्रमांमुळे महिलांना नवी दिशा, नवे व्यासपीठ आणि नवी ओळख मिळते, असे गौरवोद्गार यावेळी व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमास डॉ. दक्षा धोंगडे (कार्डिओलॉजिस्ट), प्रा. सपना बेदसे (प्राध्यापक), धनश्री गायधनी (सामाजिक कार्यकर्त्या), अरविंद सोनवणे (ट्रस्टी - महालक्ष्मी देवस्थान), ह.भ.प. संगीताताई गुंजाळ, सोनाली थोरात, आशाताई मोरे, संतोष जाधव आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदक अभिजीत कन्नडकर आणि अश्विनी पुरी यांनी अत्यंत प्रभावी शैलीत केले. कलाकार मयुरी सोनी यांच्या सुमधुर वाणीतून सादर झालेल्या भक्तिमय गीतांनी कार्यक्रमास विशेष रंगत आणली व सभागृह भक्तिरसाने न्हाऊन निघाले.

यावेळी 'शिक्षणाची शिदोरी' या सामाजिक उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य संकलन मोहिमेची घोषणा करण्यात आली. या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी आणि नागरिकांनी मनापासून स्वागत करत सामाजिक बांधिलकीची जाणीव जपणाऱ्या या प्रयत्नाचे कौतुक केले. 'शौर्य रणरागिणी न्यूज' टीमकडून उपस्थित सर्व मान्यवर, पुरस्कारार्थी, पत्रकार आणि पाहुण्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्य संपादिका सौ. गायत्री योगेश लचके यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर जिल्हा उपसंपादक तानाजी लामखेडे, संपादक योगेश गांगुर्डे, गणेश जगदाळे, उज्वला चौधरी, ॲड. विनया नागरे, कैलास अहिरे, रवींद्र घाटोळ, हेमराज वाघ, पंकज सोनार, राजनंदिनी अहिरे, कविता बाविस्कर, वर्षा कोल्हे, श्वेता बागलाने आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांसाठी सुरुची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. उत्साह, प्रेरणा, सन्मान आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम साधणारा 'शौर्य रणरागिणी न्यूज'चा प्रथम वर्धापन दिन सोहळा नाशिकमध्ये मोठ्या दिमाखात पार पडला आणि उपस्थितांसाठी तो अविस्मरणीय ठरला.

# राहुरी शहरात जनगणना मोहिमेला वेग

- बॅच क्रमांक २ च्या दुसऱ्या दिवशी प्रशिक्षण संपन्न, ७० प्रगणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती!



राहुरी : (स. गांवकरी)

देशाच्या भविष्यासाठी विकासाचा पाया ठरणारी जनगणना मोहीम आता वेग घेत असून राहुरी शहर नगरपरिषद हद्दीतील जनगणनेसाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. या मोहिमेसाठी एकूण ७० प्रगणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण दिले जात आहे. आज बॅच क्रमांक २ च्या दुसऱ्या दिवशीचे प्रशिक्षण उत्साहात पार पडले. यंदाची जनगणना पारंपरिक कागद-पेनऐवजी पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार असल्याने माहिती अधिक अचूक, सुरक्षित आणि वेगवान पद्धतीने संकलित होणार आहे. या प्रशिक्षणाचे आयोजन डॉ. दादासाहेब तनपुरे सभागृह, राहुरी नगरपरिषद येथे करण्यात आले आहे. पहिली बॅच २६ ते २८ एप्रिल २०२६ तर दुसरी बॅच ४ ते ६ मे २०२६ या कालावधीत प्रशिक्षण घेत आहे.

चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी अभिजीत हराळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुरी शहरातील १२ प्रभागांची जबाबदारी प्रगणकांवर सोपविण्यात आली असून ते प्रत्येक घरापर्यंत जाऊन माहिती संकलित करणार आहेत.

जनगणना मोहिमेबाबत मार्गदर्शन करताना अध्यक्ष भाऊसाहेब मोरे, माजी खासदार बापूसाहेब तनपुरे, गटनेते हर्ष तनपुरे, उपाध्यक्ष गजानन सातभाई, विरोधी पक्षनेते अरुण साळवे तसेच नगरसेवक बबनराव गुलदगड यांनी विविध सूचना देत मोहिमेस सहकार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी प्रशासनाने नागरिकांसाठी स्वयं-गणना सुविधा देखील उपलब्ध करून दिली असून नागरिकांना ऑनलाइन पोर्टलवर जाऊन स्वतःची माहिती स्वतः भरता येणार आहे. त्यामुळे प्रगणकांचा वेळ वाचून काम अधिक सुलभ होणार आहे. प्रशासनाने स्पष्ट केले की जनगणनेदरम्यान दिली जाणारी सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय व सुरक्षित ठेवली जाईल.

प्रगणक जेव्हा नागरिकांच्या घरी येतील तेव्हा त्यांच्याकडे अधिकृत ओळखपत्र असणार आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता अचूक माहिती देऊन या राष्ट्रीय कार्यात सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

चार्ज अधिकारी अभिजीत हराळे यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना अधिकारी श्री आगलावे शंकर, श्री स्वप्निल हारेल (टेक्निकल) हे काम पाहत असून फिल्ड ट्रेनर श्री गायकवाड, मोरे सर, खैरनार सर, गिरी सर हे प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देत आहेत.

या प्रशिक्षणासाठी राहुरी कॉलेज, प्रगती विद्यालय, विद्यामंदिर प्रशाला, भागीरथी शाळा तसेच राहुरी नगरपरिषद कर्मचारी व अधिकारी यांची प्रगणक व पर्यवेक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

दरम्यान, पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षणास अनुपस्थित राहिलेल्या प्रगणक व पर्यवेक्षकांवर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार असल्याचा इशारा मुख्याधिकारी अभिजीत हराळे यांनी दिला आहे.


# अधिकमासानिमित्त गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन!




ओतूर : (स. गांवकरी)

अधिकमास व गुरुपुष्यामृत योगाचे औचित्य साधून डुंबरवाडी येथील श्री स्वामी समर्थ भक्ती शक्ती मंदिर संचलित ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे सेवा संस्थेच्या वतीने गुरुवार दि. २१ मे २०२६ रोजी एकदिवसीय गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक कार्यक्रम भक्ती शक्ती मंदिर परिसरात भक्तिमय वातावरणात संपन्न होणार असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७.३० वाजता भूपाळी आरतीने होईल. सकाळी ८ ते १०.१५ या वेळेत श्री स्वामी चरित्र सामुदायिक पारायण, सकाळी १०.३० ते ११ वाजता स्वामींची महाआरती, तसेच सकाळी ११ ते १२ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १ ते ६ या वेळेत सामुदायिक पारायण पुन्हा होणार असून सायंकाळी ६.३० ते ७ वाजता महाआरती आणि त्यानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल. या पारायणाचे नेतृत्व सौ. प्रियंका सचिन हाडवळे व सौ. अपेक्षा दत्तात्रय गोरे करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ह.भ.प. विठ्ठल महाराज शितोळे (सर) करणार आहेत. कार्यक्रमास एन.के.टी. ट्रस्टचे अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक नानजीभाई ठक्कर ठाणावाला तसेच महाराष्ट्र पत्रकार संघ राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. पारायणासाठी येणाऱ्या भाविकांनी दिंडोरी प्रणित गुरुचरित्र ग्रंथ तसेच ग्रंथ ठेवण्यासाठी पाट, चौरंग किंवा व्यासपीठ सोबत आणावे, असे आयोजकांनी नमूद केले आहे. नाव नोंदणीसाठी सौ. सुशिला डुंबरे, सौ. सुजाता गाडेकर, श्री. अशोक डोके व सौ. प्रियंका हाडवळे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# 'बायोॲग्री नेक्स्ट २०२६'चे उद्घाटन



पुणे : (स. गांवकरी)

पहिल्या आवृत्तीच्या उल्लेखनीय यशानंतर, दुसरी 'बायोॲग्री नेक्स्ट ग्लोबल कॉन्फरन्स अँड एक्स्पो २०२६' ही १४–१५ मे २०२६ रोजी महाराष्ट्रातील पुणे येथील हॉटेल हयात रीजेन्सी येथे आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन स्नेल इंटिग्रल प्रा. लि. यांच्याकडून करण्यात आले असून, नोवोनेसिस आणि कान बायोसिस यांच्या सहकार्याने तसेच झायडेक्स ग्रुप आणि एपिलॉजिक इंडिया यांच्या मजबूत पाठिंब्याने हा उपक्रम साकारला जात आहे. या कार्यक्रमाला अधिक प्रतिष्ठा लाभणार असून, महाराष्ट्र शासनाचे माननीय कृषिमंत्री श्री दत्तात्रय भरने हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून 'बायोॲग्री नेक्स्ट २०२६'चे उद्घाटन करणार आहेत. यामुळे शाश्वत शेती क्षेत्रात भारताचे नेतृत्व अधिक बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जाणार आहे. कृषी जैविक क्षेत्रातील आशियातील सर्वात मोठे आणि प्रभावी व्यासपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या परिषदेत २५०० हून अधिक वरिष्ठ (C-level) प्रतिनिधी, ५० पेक्षा अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वक्ते, १०० पेक्षा अधिक प्रदर्शक आणि १० हून अधिक देशांतील सहभागी उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

# माणिकराव डावरे यांच्याकडून ७५ इंची इंटरॅक्टिव्ह पॅनलची भेट!






अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्याचे भूमिपुत्र तथा यशस्वी उद्योजक माणिकराव डावरे यांनी त्यांच्या प्रोफाईव्ह इंजिनिअरिंग कंपनी, कुरुळीच्या CSR निधीतून आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज, विरगाव व जि.प. प्राथमिक शाळा, कुंभेफळ या दोन शैक्षणिक संस्थांना स्मार्ट क्लासरूमसाठी प्रत्येकी एक असे 75 इंची इंटरॅक्टिव्ह पॅनल भेट दिले. या पॅनलची एकूण किंमत सुमारे रु. 1 लाख 30 हजार इतकी आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, या उद्देशाने दोन्ही संस्थांनी कंपनीच्या CSR फंडातून इंटरॅक्टिव्ह पॅनल देण्याची मागणी केली होती. या मागणीस उद्योजक माणिकराव डावरे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तात्काळ पॅनल उपलब्ध करून दिले. यापूर्वीही माणिकराव डावरे यांनी तालुक्यातील विविध शाळा, महाविद्यालये व सामाजिक संस्थांना अशाच प्रकारे शैक्षणिक व सामाजिक सुविधा उपलब्ध करून देत समाजाप्रती आपली बांधिलकी जपली आहे. त्यांच्या या शैक्षणिक योगदानाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, संस्थापक सचिव डॉ. अनिल रहाणे, संचालक सौ. सुप्रियाताई वाकचौरे, सौ. गीताताई रहाणे, शिवराज वाकचौरे, अक्षय रहाणे, सौ. प्रतीक्षा रहाणे, को-ऑर्डीनेटर प्रा. विद्याचंद्र सातपुते, प्राचार्या प्राजक्ता आंबरे-सावंत, सर्व प्राध्यापक, पालक व विद्यार्थ्यांनी आभार व्यक्त केले.

तसेच शेषनारायण डेअरीचे चेअरमन राधाकिसन कोटकर, कुंभेफळ केंद्रप्रमुख बाळासाहेब आरोटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ कोटकर, संपतराव कोटकर, सुनील कोटकर, यशवंतराव पांडे, मुख्याध्यापक बाळासाहेब गिरी, शिक्षक सुरेश चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ, पालक, शाळाप्रेमी नागरिक, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक व विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त करत डावरे यांचे अभिनंदन केले. उद्योजक माणिकराव डावरे यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील या योगदानाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# सुरगाणा तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला गती देण्याचे आश्वासन

कनाशी (स. गांवकरी)

सुरगाणा तालुक्यातील भितबारी – सराड – बोरगाव गुजरात (सापुतारा) हद्दीतून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे काम संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर तालुका अध्यक्ष राजू पवार यांनी पुढाकार घेत जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले.



या निवेदनात महामार्गाच्या कामातील विलंब, रस्त्याची अत्यंत खराब अवस्था, खोदकामामुळे निर्माण झालेली धुळीची समस्या तसेच पादचारी व वाहनधारकांना होत असलेल्या गैरसोयी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. विशेषतः दुचाकीस्वारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, संबंधित ठेकेदार व रेणुका कन्स्ट्रक्शन कंपनीकडून रस्त्यावर नियमित पाणी न मारल्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर होत असल्याचे नमूद करण्यात आले.

या बाबीची दखल घेत जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी तात्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. महामार्गाचे काम गतीने पूर्ण करण्यात येईल, वाहतुकीत अडथळे येणार नाहीत याची दक्षता घेतली जाईल तसेच उडणाऱ्या धुळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित पाणी मारण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, पावसाळा तोंडावर असताना काम पूर्ण न झाल्यास अपघातांचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. तसेच, शेतकऱ्यांच्या पिकांचे होत असलेले नुकसानही या निवेदनात अधोरेखित करण्यात आले. राजू पवार यांनी घेतलेल्या या पुढाकारामुळे प्रशासनाने तत्काळ दखल घेतल्याने स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, लवकरच रस्त्याची परिस्थिती सुधारेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



ठाणे : खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या निधीतून दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी व नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना निलेश पाटील यांच्या प्रयत्नाने अनेक दिवसापासून मागणी असलेल्या दिवा प्रभाग क्रमांक २९ फडकेपाडा येथील स्मशान भूमी सुशोभीकरण पूर्णत्वास आले. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...

### मंदिराचा जिर्णोद्धार व कलशारोहन सोहळा ८ ते १० मे रोजी होणार संपन्न

वैशाखखेडे (पिंपळवंडी) (स. गांवकरी) : वैशाखखेडे (पिंपळवंडी), ता. जुन्नर येथील श्री पंचलिंगेश्वर महादेव मंदिराचा जिर्णोद्धार व कलशारोहन सोहळा ८ ते १० मे २०२६ दरम्यान मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. सोहळ्याच्या पहिल्या दिवशी भव्य मिरवणूक, महाप्रसाद व भजन-हरिजागर होणार आहे. दुसऱ्या दिवशी पंचोपचार पूजन, देवता स्थापना, होम-हवन व हरिजागराचे आयोजन आहे. तिसऱ्या दिवशी महामंडलेश्वर त्रिपुरापुरीजी महाराज यांच्या हस्ते पादपूजन, कलशारोहन, मूर्ती प्राणप्रतिष्ठा, महाआरती व महाप्रसादाने सांगता होणार आहे. कार्यक्रमाचे पौरोहित्य श्री.विशाल कुलकर्णी, श्री.प्रशांत कुलकर्णी व श्री.केळकर गुरूजी करणार आहेत. सोहळ्यासाठी पुणेकर-मुंबईकरांसह समस्त ग्रामस्थांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### एका आठवड्यात रावेर शोध पथकाची धडाकेबाज कारवाई

रावेर (स. गांवकरी) : गुप्तबातमीद्वारे माहीती मिळाली की रावेर ता. रावेर येथे कत्तलखाना चालु असुन गोमांस विक्री करण्यासाठी नेणार आहे ०१/०५/२०२६ सकाळी गुन्हे शोध पथक हे रावेर शहरात , मशीदीच्या बाजुला गेले असता त्यांना तेथे 03 गाळयां पैकी एका गाळयात गोवंश जातीचे जनावराचे कत्तल करुन त्यांचे मांस विक्री करतांना ०१) शेख जावेद शेख सलीम कुरेशी ०२) शेख अमजद शेख रहमान कुरेशी ०३) शेख शकील शेख सलीम कुरेशी तिन्ही रा. कुरेशी मोहल्ला रावेर. यांचेवर कार्यवाही करुन त्याचे कडुन 20,000रु किंतीचे 100 किलो गोमांस जप्त करुन गुरंन- २१७/२०२६ महाराष्ट्र प्राणी सुधारणा अधिनियम १९९५ वे सुधारीत अधिनियम २०१५ वे कलम ५,५ (अ) (व) ९ (अ), ९ (ब) ११ सह भारतीय न्याय संहीता २०२३ वे कलम ३२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे . दि. ०२/०५/२०२६ चे पहाटेचे सुमारास गुन्हे शोध पथक हे रसलपुर गावात कुरेशी मोहल्ला येथे मिळालेल्या माहीतीच्या आधारे खातरजमा करण्यास गेले असता तेथे त्यांना कुरेशी मोहल्यात आरोपी नामे ०१) शेख अनिस शेख आयुब वय-३५ रा. कुरेशी मोहल्ला रसलपुर ता. रावेर हा त्याच्या राहत्या घरात गोवंश जातीचे जनावावी कत्तल करुन त्यांचे गोमांसती विक्री करतांना मिळुन आला त्याचेकडुन सदर कारवाईत ३०,०००/- रुपये किमतीचे गोवंश जातीच्या जनावरावे कत्तल केलेले १५० किलो वजनाचे मांस, लोखंडी कुऱ्हाड, कोयता असे एकुण ३०,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. गुरंन- २१८/२०२६ महाराष्ट्र प्राणी सुधारणा अधिनियम १९९५ वे सुधारीत अधिनियम २०१५ वे कलम ५,५ (ब), ५ (क), ९,९ (अ) (व), ११ भारतीय न्याय संहीता २०२३ वे कलम ३२५ प्रमाणे गुन्हा दाखल करुन वरील आरोपीतास अटक करण्यात आलेली आहे.

### बंगालसह इतर दोन राज्यांत भाजपचा ऐतिहासिक विजय; भव्य विजय उत्सव

डांग, गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्याच्या प्रवेशद्वार असलेल्या वघई येथे पश्चिम बंगालसह इतर राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाच्या पार्श्वभूमीवर उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. विधानसभा निवडणुकीच्या निकालांमध्ये भाजपच्या प्रभावी कामगिरीमुळे देशभर आनंदाची लहर पसरली असून त्याचे पडसाद डांग जिल्ह्यातही उमटले. पश्चिम बंगालमध्ये भाजपने नोंदवलेल्या उल्लेखनीय यशाला कार्यकर्त्यांनी “परिवर्तनाचा प्रचंड जनमत” असे संबोधले. तसेच पुदुच्चेरी आणि आसाममध्ये मिळालेल्या मजबूत विजयामुळे काँग्रेससमोर कठीण आव्हान उभे राहिले असून या तिन्ही राज्यांत ‘कमळ’ फुलल्याचे सांगण्यात आले. या ऐतिहासिक यशाला कार्यकर्त्यांनी “हॅट्रिक विजय” असेही म्हटले. वघई येथे भाजप कार्यकर्त्यांनी भव्य विजय उत्सव साजरा केला. यावेळी फटाके फोडण्यात आले, एकमेकांना मिठाई वाटण्यात आली आणि देशभक्तीपर घोषणांनी वातावरण भारावून गेले. “वंदे मातरम्” आणि “जय श्री राम” यांच्या घोषणांनी संपूर्ण वघई परिसर दुमदुमून गेला. या प्रसंगी डांग जिल्हा भाजप संघटनाध्यक्ष किशोरभाई गावित यांच्यासह धर्मेश पटेल, पंकज पटेल, व्यापारी नेते सुभाषभाई बोरसे, सुरेशभाई कंजिया, मयूरभाई पटेल, बिपिनभाई राजपूत आणि संदीपभाई सुरती यांसह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित नेते आणि कार्यकर्त्यांनी हा विजय पंतप्रधानांच्या सक्षम नेतृत्वावर, विकासाभिमुख धोरणांवर आणि जनकल्याणकारी योजनांवर जनतेचा दृढ विश्वास असल्याचे प्रतिक असल्याचे सांगितले. संपूर्ण कार्यक्रमात उत्साह आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

### गायब झालेल्या अल्पवयीन मुलीचा काही तासांत कुटुंबाशी पुनर्मिलाप

डांग, गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षक Pooja Yadav यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील हरवलेल्या व्यक्तींना शोधण्यासाठी “ऑपरेशन मिलाप” हे विशेष अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत सुबीर पोलीस स्टेशन हद्दीतील एक अल्पवयीन मुलगी दिनांक 04/05/2026 रोजी कोणालाही न सांगता घरातून निघून गेली होती. या घटनेची गंभीर दखल घेत डांग जिल्हा लोकल क्राईम ब्रँचचे PSI जे. जी. अंडकट आणि त्यांच्या पथकाने तात्काळ तांत्रिक व मानवी स्रोतांच्या मदतीने शोधमोहीम सुरू केली.तपासादरम्यान संबंधित मुलगी आहवा बस स्थानकाजवळ असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी त्वरीत कारवाई करून तिला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. चौकशीत समोर आले की, घरकाम शिकण्याबाबतच्या चिंतेमुळे ती घर सोडून गेली होती. त्यानंतर महिला पोलिसांकडून तिचे समुपदेशन करण्यात आले.

# भाऊराव भागडे यांना महाराष्ट्र ग्रामरत्न सरपंच पुरस्काराने सन्मानित

इगतपुरी : (स. गांवकरी)

अखिल भारतीय सरपंच परिषद आणि जयंत पाटील मित्र मंडळ, यांच्या वतीने इगतपुरी तालुक्यातील मानवेढे येथील माजी सरपंच तथा अभियंता भाऊराव ज्ञानेश्वर भागडे यांना महाराष्ट्र ग्रामरत्न सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अखिल भारतीय संरपंच परिषदेच्या वतीने प्रत्येक वर्षी ज्या सरपंचानी गाव खेड्यासाठी उल्लेखनीय कार्य केले असेल अशा महाराष्ट्र भरातून सरपंचांना आमंत्रित करून त्यांचा ग्रामरत्न पुरस्कार देवुन सत्कार व सन्मान केला जातो. या वर्षी इगतपूरी तालुक्यातुन तसेच आगरी समाज्यातून एकमेव ग्रामरत्न पुरस्कार आगरी सेनेच युवा तालुकाध्यक्ष भाऊराव भागडे यांना देण्यात आला. भाऊराव भागडे यांच्या अभिनव कल्पना आणि ग्रामीण भागातील गावखेडी आणि ग्रामस्थांबद्दल असलेल्या प्रेमापोटी केलेल्या



ग्रामविकासाचा समाजसेवेचा गौरव म्हणून सन्मानित करण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष जयंत सर्जेराव पाटील यांनी दिली. गेल्या दहा वर्षापासुन मानवेढे येथील अतिर्गम जांमुडे व मानवेढे गावातील सामाजिक सांस्कृतिक क्रिडा विभागात लाखो रुपये निधी गावासांठी मंजूर करुन शासन स्तरावर रस्ते, पाणी, पथदिप, तुरुण मुलांना क्रिडांगण, व्यायाम शाळेत साहित्य, रेशनकार्ड, सौरउर्जा पथदिप, सांडपाणी गटारी, वृक्षारोपन, सभामंडप, स्वछ व सुंदर गाव असे उल्लेखनिय कार्य भागडे यांनी केले आहे. हा पुरस्कार वितरण कार्यक्रम महाबळेश्वर येथील निसर्गरम्य वातावरणात पाचगणी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या प्रसंगी भाऊराव भागडे यांना जयंत पाटील व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्रक देण्यात आले. भागडे यांच्या कामाची पावती म्हणून त्यांना या पुरस्काराने एक प्रेरणा व जिद्द मिळेल असे मत व्यासपिठावरील प्रमुख मान्यवरांनी व्यक्त केले. या प्रसंगी व्यासपिठावर संस्थापक अध्यक्ष जयंत सर्जेराव पाटील, मुंबई पश्चिम आमदार तुकाराम हुकुराम ,पुणे प्रदेश उपाध्यक्ष शशिकांत मोरे, व्याख्याते प्रदिप पांगरकर, कोल्हापुर राज्य कार्यकारणी सदस्य संजय कांबळे, नागपुर विदर्भ मुख्य प्रभारी प्रमोद गमे, जळगाव राज्य कार्यकारणी सदस्य रुपेश गांधी, सांगली पश्चिम महा. प्रमुख प्रदीप माने, विदर्भ प्रमुख गडचिरोली संदिप ठाकुर, पुणे महिला आघाडी राज्य कार्यकारणी सदस्य उज्वला गोकुळे व पंचायत राज विकास मंचचे पदाधिकारी यांच्यासह आगरी सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष गणेश कडु, जिल्हाध्यक्ष संतोष कडु, भागिरथ आतकरी यांनी भागडे यांचे अभिनंदन केले. भागडे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल मानवेढे व इगतपुरी तालुक्यातुन अभिनंदन केले जात आहे.

# ६ वर्षांच्या ईशाने दिला पर्यावरणासोबत माणुसकीचा संदेश

ठाणे : (स. गांवकरी)

पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी केवळ वय नाही, तर संवेदनशील मन आणि संस्कारांची गरज असते, हे ठाण्यातील ईशा संदीप मोरे या ६.५ वर्षांच्या चिमुकलीने सिद्ध करून दाखवले आहे. ईशाने तिचे आई-वडील कविता आणि संदीप मोरे यांच्यासोबत भेट देऊन 'प्रकल्प आशादायी' (Project Aashayein) उपक्रमासाठी स्वतः जमा केलेल्या ५१ NWPP (नॉन-वोव्हन) पिशव्या सुपूर्द केल्या. ईशाचे हे पाऊल केवळ पिशव्या जमा करण्यापुरते मर्यादित नाही, तर ते 'REACH' (जबाबदारी, सहानुभूती, जागरूकता, करुणा आणि सुसंवाद) या मूल्यांचे जिवंत उदाहरण आहे. जेव्हा कविता आणि संदीप मोरे यांच्यासारखे पालक आपल्या मुलांना अशा उपक्रमात सहभागी




करून घेतात, तेव्हा खऱ्या अर्थाने समाज बदलतो. पर्यावरण रक्षण हा केवळ सरकारचा विषय नसून, घरातील प्रत्येक सदस्याने त्यात वाटा उचलणे हाच खऱ्या जागरूकतेचा आणि समस्येवरचा खरा उपाय आहे. हा ठाणे जिल्हा प्रशासनाचा एक पथदर्शी (Pilot) प्रकल्प असून तो विजयकुमार कट्टी (संस्थापक, वेसॅक इंडिया) यांच्या संकल्पनेतून साकार झाला आहे. या मोहिमेला मनोज सानप (जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे) यांचे सक्रिय सहकार्य लाभले असून, ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ I.A.S. यांनी याला विशेष पाठबळ दिले आहे.

# बी. एड. छात्राध्यापकांचे स्वच्छता अभियान उत्साहात संपन्न

नारायणगाव : (स. गांवकरी)

ग्रामोन्नती मंडळ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नारायणगाव येथील बी.एड.च्या छात्राध्यापकांनी नारायणगाव बस स्थानक परिसरात स्वच्छता अभियान राबवत सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला. या उपक्रमाबाबत माहिती महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. बाळासाहेब मुरादे आणि कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. सुनीता पाटोळे यांनी दिली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकपर मनोगतात डॉ. सुनीता पाटोळे यांनी विद्यार्थ्यांचे समाजातील स्थान अधोरेखित करताना सांगितले की, आजचा विद्यार्थी हा उद्याचा शिक्षक असून तोच देशाच्या भविष्यातील घडणीत महत्त्वाची भूमिका बजावतो. शिक्षकांनी स्वच्छतेचा सद्गुण अंगीकारल्यास भविष्यातील पिढी निरोगी व सुसंस्कृत घडण्यास मदत होते. तसेच या स्वच्छता अभियानामागील उद्दिष्टे त्यांनी सविस्तरपणे स्पष्ट केली. यावेळी मा. प्राचार्य डॉ. बाळासाहेब मुरादे यांनी मार्गदर्शन करताना “स्वच्छता हा एक महत्त्वाचा सद्गुण असून त्याचा अवलंब केल्यास समाजातील अनेक समस्या कमी होऊ शकतात.स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण झाली असून श्रमप्रतिष्ठा या मूल्याची रुजवणूक झाली आहे. असे मत व्यक्त केले. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वच्छतेचे महत्त्व जाणून घेऊन ते आचरणात आणावे, तसेच भविष्यात शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांमध्येही ही जाणीव निर्माण करावी, असे त्यांनी सांगितले. स्वच्छतेमुळे रोगराई कमी होऊन सुसंस्कृत समाज निर्मितीस हातभार लागतो, असेही त्यांनी नमूद केले. नारायणगाव बस स्थानक प्रमुख श्रीमती. एस .एस. कालेकर यांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत करत शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या अभियानात बी.एड. प्रथम वर्षाच्या छात्राध्यापकांनी उत्साहाने सहभाग घेत बस स्थानक व परिसराची स्वच्छता केली. विद्यार्थ्यांनी कचरा गोळा करून स्वच्छतेबाबत जनजागृती केली आणि नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. वैभव खराडे यांनी केले.

# महामानवांच्या विचारांचा जागर होतो : डॉ. सबनीस

नारायणगाव : (स. गांवकरी)

वडगांव मावळ नगरीत मिलिंद युवक मंडळ ट्रस्ट व संघमित्रा महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला तथागत भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या संयुक्त जयंती महोत्सव २०२६ सोहळा संपन्न झाला वडगाव मावळ येथे महामानवांच्या संयुक्तपणे जयंती सोहळ्याच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले,' संयुक्तपणे जयंती सोहळ्याने महामानवांच्या विचारांचा जागर होतो." समाज प्रबोधनाचे मुख्य साधन जर कोणते असेल? तर ते महामानवांची संयुक्तपणे जयंती सोहळा साजरा करणे.




तीन दिवस चाललेल्या या महोत्सवाने सामाजिक ऐक्य, बंधुता, समता आणि महापुरुषांच्या विचारांचा जागर यशस्वीपणे घडवून आणला.१ ते ३ मे दरम्यान पार पडलेल्या या महोत्सवात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. ०१ मे रोजी धार्मिक विधी, रक्तदान शिबिर आणि महिलांसाठी आकर्षक “खेळ रंगला पैठणीचा” हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अनेक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली. याच दिवशी अन्नदानाचा उपक्रम राबवून समाजाप्रती बांधिलकी जपण्यात आली.२ मे रोजी महापुरुषांच्या प्रतिमांची भव्य-दिव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात, जयघोष आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. विविध समाजघटकांचा मोठ्या संख्येने सहभाग लाभला. यावेळीही अन्नदानाचा उपक्रम पार पडला.

३ मे रोजी जयंती महोत्सवाचा प्रमुख पर्व जाहीर सभेच्या माध्यमातून पार पडला. या जाहीर सभेचे अध्यक्ष म्हणून मिलिंद युवक मंडळाचे विश्वस्त प्रकाश गायकवाड यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

“विचारांचा योद्धा” म्हणून ओळखले जाणारे प्रख्यात वक्ते डॉ. श्रीपाल सबनीस यांनी आपल्या प्रभावी भाषणातून महापुरुषांचे विचार, त्यांचा इतिहास आणि आजच्या काळातील महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारप्रवर्तक भाषणाने उपस्थितांना प्रेरणा मिळाली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. लाखे सर, भास्कर आप्पा म्हाळसकर, गुलाबराव म्हाळसकर, महेंद्र म्हाळसकर, नगरसेवक शंकर भोंडवे, नगरसेवक संदीप म्हाळसकर, नगरसेवक अजय भवार आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमादरम्यान “मावळ भूषण” जेष्ठ साहित्यिक प्रभाकर ओव्हाळ यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन भव्य सत्कार करण्यात आला.

सभेचे सूत्रसंचालन ॲड. मिलिंद ओव्हाळ व ॲड. नितीन सावळेराम ओव्हाळ यांनी केले. प्रास्ताविक अनिल ओव्हाळ यांनी मांडले. स्वागत समितीमध्ये किरण ओव्हाळ, संदीप हिरभगत, नितीन आल्हाट व आशिष भालेराव यांनी उत्तम नियोजन केले. आभार प्रदर्शन सिद्धार्थ भालेराव व अबिद सय्यद यांनी केले.सभेनंतर रात्री महाराष्ट्रातील लोकप्रिय गायक साजन बेंद्रे व विशाल यांच्या गायनाचा कार्यक्रम पार पडून वातावरण उत्साहाने भारावून गेले.

या संपूर्ण जयंती महोत्सवाचे आयोजन जयंती महोत्सव कमिटी अध्यक्ष देवकुमार भिकाजी ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडले. कमिटीमध्ये कार्याध्यक्ष सोपान पाटोळे, सह कार्याध्यक्ष विजय गायकवाड व शरद टपाले, तसेच उपाध्यक्ष अनिल ओव्हाळ यांनी मोलाची जबाबदारी पार पाडली. संघमित्रा महिला मंडळाच्या अध्यक्षा सुनीता देवकुमार ओव्हाळ, कार्याध्यक्ष वैशाली ओव्हाळ, खजिनदार ललिता टपाले व श्रध्दा भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली “खेळ रंगला पैठणीचा” हा कार्यक्रम विशेष यशस्वी ठरला.

# पडघा ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहारांची चौकशी सुरू

भिवंडी : (स. गांवकरी)

- लाखो रुपयांच्या अपहाराचा संशय
- ग्रामविकास संस्थेच्या तक्रारीची दखल; बाजार शुल्क, जलजीवन योजना आणि शासकीय योजनांतील अनियमिततेवर प्रशासनाचे लक्ष




भिवंडी तालुक्यात वेगाने वाढणाऱ्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या पडघा ग्रामपंचायतीतील विविध आर्थिक व विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारीनंतर अखेर या प्रकरणाची अधिकृत चौकशी सुरू करण्यात आली आहे. पडघा ग्रामविकास सामाजिक संस्थेने केलेल्या तक्रारीची दखल घेत ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिले आहेत. गावाच्या विकासासाठी स्थापन झालेल्या या संस्थेचे अध्यक्ष सुनील पाटील, सचिव जयेश जाधव, खजिनदार मनोज गुंजाळ यांच्यासह १४ पदाधिकारी मागील दोन वर्षांपासून ग्रामपंचायतीतील विविध गैरप्रकारांविरोधात सातत्याने पाठपुरावा करत आहेत. दोषींवर कारवाई व्हावी, यासाठी संस्थेने ग्रामपंचायतीसमोर उपोषणही केले होते. त्या वेळी भिवंडी पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी चौकशी करून कारवाईचे आश्वासन दिले होते; मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप संस्थेने केला आहे. संस्थेच्या तक्रारीनुसार, पडघा येथील बाजारपेठेतून सुमारे २८ लाख ५३ हजार रुपये बाजार शुल्क रोख स्वरूपात वसूल करण्यात आले, परंतु ही रक्कम ग्रामपंचायतीच्या अधिकृत बँक खात्यात जमा करण्यात आलेली नाही. त्यामुळे मोठ्या आर्थिक अपहाराचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. तसेच संबंधित प्रकरणात केवळ नोटिसा देऊन दोषींना वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. याशिवाय, जलजीवन योजनेअंतर्गत सुमारे १५ कोटी रुपये खर्च झाल्याचा दावा केला जात असताना प्रत्यक्षात गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्याचा कोणताही ठोस लाभ मिळालेला नाही. इतकेच नव्हे तर गावात जलशुद्धीकरण यंत्रणा कार्यरत असल्याची खोटी माहिती न्यायालयात सादर केल्याचा गंभीर आरोपही संस्थेने केला आहे. तसेच गावातील शासकीय जमिनींवरील अतिक्रमणांच्या बाबतीतही प्रशासनाची भूमिका संशयास्पद असल्याचे नमूद करण्यात आले आहे. अतिक्रमणे अस्तित्वात असूनही ती नसल्याचे खोटे अहवाल सादर करून चौकशी अधिकाऱ्यांची दिशाभूल केल्याचा आरोप ग्रामसेवक भास्कर घुडे यांच्यावर करण्यात आला आहे. ग्रामसभेचा ठराव असतानाही अतिक्रमणांवर कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दिव्यांग कल्याण योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना निधी वितरित करण्याचा ठराव असतानाही २०१८ ते २०२२ या कालावधीत कोणतीही मदत देण्यात आलेली नसल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. या सर्व आरोपांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामविकास संस्थेने केली आहे. “तक्रारींचे समाधानकारक निराकरण होईपर्यंत आणि संबंधितांवर कारवाई होईपर्यंत आमचा लढा सुरूच राहील,” असा इशारा संस्थेचे अध्यक्ष सुनील पाटील यांनी दिला आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेकडून सुरू असलेल्या या चौकशीकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले असून, या प्रकरणात पुढे काय निष्पन्न होते याकडे नागरिकांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)